# प्रकरण पाचवे

# उ प सं हा र

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा गौरवशाली व रोमहर्षक आहे. इंग्रजाविरुद्ध १८५७ चा झालेला उठाव हा महत्त्वाचा होता. तो अपयशी झाला तरी भारतात इंग्रजी राजवटी विरोधी वातावरण दिवसें-दिवस वाढत गेले. १८५८ नंतर भारतात मद्रास, कलकत्ता, मुंबई विद्यापीठे स्थापन झाली व भारतातील तरुण वर्ग इंग्रजी शिकू लागला. पुढे १८८५ ला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली आणि स्वातंत्र्यचळवळीस जोर आला. न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळकृष्ण गोखले, लो. टिळक इत्यादींनी राष्ट्रीय चळवळ आपल्या परीने पुढे नेली.

लो. टिळकांनंतर कॉंग्रेसचे नेतृत्व म. गांधींच्याकडे गेले. आणि स्वातंत्र्य चळवळीला फार मोठा जोर आला म. गांधींनी असहकार चळवळ सुरु केली, तसेच स्वदेशी चळवळ सुरु केली. परंतु १९४२ ला जी "चले जाव" चळवळ सुरु केली ते भारताच्या स्वातंत्र्य लढयाचे अखेरचे पर्व होते. दुसऱ्या महायुध्दात जर्मनीशी लढताना इंग्रजांची ताकद कमी झाली होती. व इंग्लंड दुर्बल झाला होता. त्याचवेळी भारतात म. गांधींच्या नेतृत्वाखाली ८-९ ऑगष्ट ,१९४२ साली "चले जाव" चळवळ सुरु झाली आणि संपूर्ण भारतातील स्वातंत्र्यप्रेमी जनता ह्या चळवळीत सहभागी झाले.

मुंबई प्रांतात सातारा जिल्ह्यामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली ४२ च्या चळवळीस फार मोठा प्रतिसाद मिळाला नाना पाटलांचा एक निष्ठावंत सहकारी व अनुयायी कै. लक्ष्मण रावजी ठोंबरे उर्फ तांबटकाका

(१८९९ - १९८२) हे एक होत. त्यांचे प्रमुख कार्य म्हणजे स्वातंत्र्य सैनिकांना दारुगोळा व बॉम्ब पुरविणे तांबटकाकांचा पिढीजात व्यवसाय शोभेची दारु तयार करणे हा असल्याने त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी करुन छोटे मोठे बॉम्बगोळे तयार केले व ब्रिटीश विरोधी दहशत निर्माण करण्यासाठी त्या दारुगोळ्याचा उपयोग नाना पाटील व त्यांचे इतर सहकारी यांनी सातारा, सांगली, कोल्हापूर भागात केला.

१५ ऑगष्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला व नवीन पर्व सुरु झाले. काही स्वार्थी स्वातंत्र्य सैनिकांनी राजकारणात भाग घेऊन मानाची स्थाने पटकावली. स्वातंत्र्योत्तर काळात काही स्वातंत्र्य सैनिक आमदार खासदार मंत्री, राज्यपाल बनले. पण तांबटकाका हे एक आगळेवेगळे स्वातंत्र्य सैनिक होते. प्रसिध्दीपासून अलिप्त राहून त्यांनी कोणतीही निवडणूक लढविली नाही किंवा पद स्विकारले नाही. १९४७ नंतर ते शैक्षणिक व सामाजिक कार्याकडे वळलेले दिसतात. कुंडलसारख्या, ग्रामीण भागात १९४८ ला नाना पाटील वसतिगृह सुरु करुन अनेक गोर-गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय करुन दिलेली आहे. ते आपल्या शेवटच्याक्षणापर्यंत या शैक्षणिक कार्यात गुंग होते. शैक्षणिक कार्य करीत असतानाच पददलितांचा उध्दार करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने त्यांना "दलितमित्र" अशी सार्थ पदवी देऊन यथोचित गौरव केलेला आहे. तांबटकाका सर्व ह्यातभर नि:स्वार्थ बुध्दीने काम करत राहिले. त्यांना महाराष्ट्र शासनाने व केंद्रशासनाने दोन स्वातंत्र्य सैनिकांच्या पेन्शन दिल्या होत्या. त्या सुध्दा त्यांनी वसतिगृहास दिल्या. अनेक जातीधर्माची मुले या वसतिगृहात राहून शिक्षण घेत होती व पुढे मोठी झालेली आहेत. त्यापैकी सध्याचे शिक्षणमंत्री ना. डॉ. पतंगराव कदम हे एक होत. तसेच त्यांनी महात्मा गांधी शिक्षण संस्था (१९७०) स्थापन करुन त्याद्वारे पाच हायस्कूल्स्

काढून शिक्षण प्रसाराचे कार्य ग्रामीण भागात केले आहे. तसेच त्यांनी मुलींच्यासाठी एक कन्याछात्रालयसुध्दा सुरु केले होते.

सानेगुरुजींच्या नंतर महाराष्ट्राला लाभलेली माऊली, महाराष्ट्रातील हजारो लेकरांची माता, गरीब अनाथ - पोरक्या लहान "मुलांची आई" शेकडो विद्यार्थ्यांचे जीवनाधार, सातारा जिल्हयाचे प्रसिध्द क्रांतीकारक सामाजिक व शैक्षणिक कार्यकर्ते आणि दलितमित्र पदवी लाभलेली व्यक्ती म्हणजे कर्मवीर के. लक्ष्मण राघजी ठोंबरे उर्फ तांबटकाका हे होत.

तांबटकाका हे अतिशय साधेपणाने राहात. म. गांधींचे विचार-आचार यांचे ते तंतोतंत पालन करत. साधी राहणी व उच्च विचारसरणी होती. त्यांची दिनचर्या ही कशी होती हे पाहण्यासारखे आहे. म्हणून मी देत आहे. कुंडलमध्ये रोज त्यांचा दिनक्रम आखीव असायचा. पहाटे ५ ला उठत असत. तंबाखू खात आणि प्रातर्विधीस जाऊन येत. जाताना कोण मुलगा कुठे कसा झोपलाय ते पाहात. त्यानंतर सकाळी मुलांना उठवण्यासाठी घंटा वायला सांगत . तोंड धुवून मुलं मनाचे श्लोक म्हणत आणि अभ्यासाला बसत, नंतर काका ताकारी रस्त्यापर्यंत माळी किंवा घाटगे यांच्या शेतापर्यंत चालत जाऊन येत असत. त्यानंतर उडपी किंवा खारगे यांच्या हॉटेलमध्ये चहा घेत. मग बोर्डिंगमध्ये येऊन बसत असत. मुले स्वच्छता, आंघोळ करीत तोपर्यंत काका बोर्डिंगमधील आवारात फिरत असत. सर्व मुलांच्या जेवणाची काळजी आस्तेवाईकपणे करीत असत. जिथे मुले राहात, तिथेच काका राहात. जे मुलं खात तेच काका खात होते. ज्वारीची भाकरी, तुरडाळीची फोडणी दिलेली आमटी, उडदाची आमटी, ताक, भातवडया, फडफडीत भात, भाताची खरवड, शेंगदाणे, दूध, तूप, मक्याची भाजेली कणसे, राजगि-याची भाजी, तांबट-

काकांना खूप आवडत असे काकांचा सर्व दिनक्रमच मुलांच्याबरोबर असायचा. त्यांच्याशिवाय काकांना करमत नसे. [१] दिवसभर लोकांची ये-जा होत असे. सायंकाळी सर्व मुले जेवलीत का ? एखादा जेवला नसेल तर का नाही ही चौकशी जातीने करीत असत. रात्री मुलं अभ्यास करतात का ? मुलं व्यवस्थित झोपलीत का ही सर्व काळजी काका घेत होते. दरवाजा नीट लावलाय का ते पहात. अनेक लहान-सहान गोष्टी काका पहात होते. रात्री १०-१२ चे सुमारास काका झोपायचे. बाहेरगावी गेले तरी त्यांचा फिरण्याचा व्यायाम थांबवत नसत. मुक्काम कोठेही असला तरी त्यात खंड पडू दिला नाही. अशाप्रकारे त्यांची दिनचर्या होती.

काकांना पान, तंबाखूचे व्यसन होते. त्यांचे दात शेवटपर्यंत चांगले राहिलेले होते. बाकी कशाचेही व्यसन नव्हते. [२] शेवटी शेवटी म्हणजे १९७५-७६ नंतर ते शिवांबू घेत असत. दिवसातून ब-याच वेळा काका "श्री गुरुदेव दत्त" असे २-३ वेळा म्हणत असायचे. असे काकांचे व्यक्तिमत्व होते. [3] अशा या काकांचा मृत्यू रक्तदाबाने ३० जुलै, १९८२ मध्ये "शारदा क्लिनिक" कराड येथे झाला. व थोर समाजसुधारकास भारताला गमवावे लागले.

तांबटकाका यांना श्रध्दांजली वाहताना बॅ. पी.जी. पाटील (मुंबई) म्हणाले, "आपले गुरु पक्के असतील तर आपणाही शोक आवरला पाहिजे. नाही तर, परका गुरु रडका चेला । दोहोंचा श्रम वाया गेला ।" असे होते. ती परिस्थिती तुमच्या संस्थेत निर्माण होऊ नये असे वाटते. पुज्य काकांची शिकवण अंशत: तरी आपण आचरणात आणली तरच आपण त्यांच्या ऋणातून थोडेफार मुक्त होऊ. [४]

श्री वसंतदादा पाटील (राज्यपाल, राज्यस्थान राज्य) हे म्हणाले,

"कै. काकासाहेब यांनी ग्रामीण भागातील शिक्षणाचा लाभ घेता यावा म्हणून क्रांतीसिंहाच्या नांवाचे वसतिगृह सुरु करुन जे काम केले आहे ते कधीही विसरता येणार नाही. त्यांनी सुरु केलेले हे काम व्यवस्थित व निरंतरपणे पुढे चालविणे हीच त्यांना श्रध्दांजली ठरेल." ५ यावरुन खरोखरच काका ही एक मोठी आसामी होऊन गेली असे वाटते.

तसेच तांबटकाकांना श्रध्दांजली वाहताना प्राचार्य ना.सि. कुल्लूर, (मंगळवेढा) म्हणतात, "क्रांतीसिंह नाना पाटलांच्या नावाने काकांनी स्थापन केलेली संस्था म्हणजे त्यांचे चिरंतन स्मारक आहे. त्यांनी माझ्या सारख्या अनेक मुलांना घडविले हे सुध्दा त्यांचेच स्मारक आहे."

"काकांनी ज्या नि:स्वार्थ बुध्दीने सर्वांवर प्रेम दाखविले ते पाहून त्यांचा आत्मा मुक्तच होता. आपण सर्वांनी त्यांचे कार्य पुढे चालविणे हीच खरी त्यांना श्रध्दांजली होय." ६

कै. आप्पासाहेब बिरनाळे (कुंडल) म्हणतात की, "तांबटकाका हे थोर स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत केलेल्या कार्यास तोड नाही. त्यांनी आपली सर्व संपत्ती कुंडल येथील क्रांतीसिंह नाना पाटील वसतिगृहास अर्पण केली. ही कुणालाही अभिमानास्पद वाटणारी मोठी बाब आहे." ७

कुंडलचे रविंद्र तोडकर काकांना श्रध्दांजली वाहताना म्हणतात, "सामाजिक कार्यास जीवन वाहून घेणारे, ४२ च्या क्रांतीमध्ये हिरीरीने पुढाकार घेऊन चोख कामगिरी बजावणारे मुत्सदी समाज धरीन तांबटकाका हे केवळ

नाना पाटील वसतिगृहाचे अगर कुंडल गावचे काका न राहाता ते संपूर्ण महाराष्ट्राचे काका बनले होते." [८]

वसतीगृह हाच आपला प्रपंच मानून काकांनी मनोभावे, समाजसेवेचे वृत्त अंगीकारून अखंडपणे झागडणाऱ्या तांबटकाकांच्या रूपाने अस्मितेच्या क्षितिजावला तारा निखळला असून व काळाच्या उदरात लुप्त झाला आहे.

"झाले बहू, होतील बहू
परि यासम हा ।।"

शिक्षक वर्ग, टिळक हायस्कूल, कराड हे श्रध्दांजली वाहताना म्हणतात, "समाजाच्या उत्खननाचा इतिहास काकांनी घडविला, पिढ्यान् पिढ्या काकांच्या कार्याचे ऋण समाजावर राहिल. तांबटकाकांच्या आत्म्यास चिरशांती मिळावी." [९]

"आयुष्यभर त्यांनी अंगिकारलेल्या कर्मयोगाचे आपल्या आयुष्यात आचरण करणे हीच त्यांना खरीखुरी श्रध्दांजली ठरेल." किर्लोस्कर ब्रदर्स लि., दुधवटयाच्या ठरावातून ही श्रध्दांजली वाहण्यात आली.[१०]

कुंडलचे डॉ. एस्.जी. जरंडीकर श्रध्दांजली वाहताना म्हणतात, तांबटकाका हे परमेश्वरी अवतारच होते. त्यांनी आपले या ठिकाणचे कार्य संपवून नवीन कार्यासाठी पंचत्वात विलीन झाले. आयुष्यभर समाजाची सेवा करण्याची संधी दिली नाही ह्याबद्दल खंत वाटते. एक थोर मनाचा अजातशत्रू हरपला. परमेश्वर त्यांना नवीन कार्यासाठी पुनर्जन्म देवो हीच प्रार्थना." [११]

तांबटकाका स्मृतीग्रंथ प्रसिध्द झाला त्यावेळी महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांनी काकांच्या कार्याचा आपल्या पत्रातून गुणगौरव केला असे काही मान्यवरांचे काकांच्या बद्दलचे अभिप्राय पुढे देत आहे. दि. ८.१०.१९८६ साली लिहिलेल्या पत्रात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण लिहितात, की "कै. लक्ष्मण रावजी ठोंबरे उर्फ तांबटकाका यांचे जीवनकार्य हजारोंना स्फूर्ती देणारे व कार्यप्रवण करणारे आहे. भारतीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी कारावास भोगला. स्वातंत्र्यानंतर राजकारणापासून दूर राहून ग्रामीण भागातील मुलांसाठी त्यांनी वसतिगृहाची स्थाना केली व मोठे शैक्षणिक कार्य केले." [१२]

दि. ९.४.८६ च्या पत्रात वि.स.पागे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद) लिहितात, "काकांचे एका वाक्यात वर्णन करावयाचे म्हटल्यास "निष्काम सेवेचा मूर्तीमंत पुतळा" असेच करावे लागेल. काकांचे अंत:करण जर तपासले तर प्रामुख्याने काकांच्या जीवनात कोणीही विसरु शकणार नाही असेच दिसेल. तर हीच काकांच्या कार्याची पावती होय."[१३]

शरद पवार दि. ८ मार्च, १९८६ च्या पत्रात लिहितात, "कर्मवीर तांबटकाकांनी प्रतिसरकार मध्ये केलेले कार्य अतिशय धडाडीचे व असीम त्यागाचे होते. स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन समाजातील व दलित वर्गातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून गांधी एज्यूकेशन संस्था, क्रांतीवीर नानासाहेब पाटील विद्यार्थी वसतिगृह वगैरे स्थापन करुन आणि अनेक अडचणी सोसून यशस्वीपणे चालवून ग्रामीण भागाचा पुनरुत्थानासाठी मोठा वाटा उचलला." [१४]

कै. तांबटकाका यांच्या कार्यापासून तरुण आणि नवीन पिढीस देश प्रेम आणि समाजाची बांधीलकी याबद्दल आस्था निर्माण होवो

आणि त्यांच्या हातून चांगले कार्य घडो हीच सदिच्छा." [१४]

दे.भ. रत्नाप्पा कुंभार, दि. ६.१.१९८६ च्या पत्रात आपले मत मांडतात की, "स्वर्गीय तांबटकाका हे असे थोर समाजसेवक होते, त्यांच्या जीवन कार्याचे दर्शन येणाऱ्या पिढीला चांगल्या तऱ्हेने होत राहण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने त्यांच्या जीवनकार्याचा स्मृतीग्रंथ मला अतिशय महत्त्वाचा वाटतो. स्वर्गीय तांबटकाका यांच्या जीवन कार्याच्या प्रेरणा येणाऱ्या पिढीला सतत मिळत राहोत." [१५]

महाराष्ट्राती सुप्रसिध्द विचारवंत प्रा. गं.बा. सरदार आपल्या दि. १८.९.८६ च्या पत्रात लिहितात, -"दलितमित्र स्मृतीग्रंथ प्रसिध्द केल्यामुळे दलितमित्र, निष्ठावंत, कर्मवीर तांबटकाका यांची स्मृती जागृत होत आहे. आणि त्याचबरोबर आपल्या नवोदित कार्यकर्त्यांना स्वातंत्र्यपूर्व काळातील एका पिढीच्या ज्वलंत ध्येयवादाचे कर्तव्य भावनेने दर्शन घडत आहे." [१६] यावरून या व्यक्तिचे महान कर्तृत्व दिसून येते.

"काकांना स्वार्थ हा शब्द अस्तितत्वात आहे किंवा नाही याची कल्पनाच नसावी. त्यांचे सर्वस्व म्हणजे वसतिगृह आणि त्यांचे विद्यार्थी."

आज कुंडल परिसरातील कित्येक लोक असे भेटतील की, काकांचे सहाय्य त्यांना मिळाले नसते तर साक्षरतेलाही पारखे झाले असते." असे पी.डी. गुणे म्हणातात.

काकांच्याबद्दल प्रत्येक व्यक्तीचे काही विचार/वाक्ये होती ती थोडक्यात पुढे नमुद करत आहे. [१७]

लोक काय बोलतात ः

× कुंडलच्या बोर्डिंगची आई "तांबट काका" - क्रांतीसिंह नाना पाटील.

× "औंधच्या पंत बाबांच्या सारखं तांबटकाकांचे कार्य आहे."

- श्री साबडे, पुणे

× "लिंबाच्या लोकांनी देव माणसाचा सत्कार केला."

- कै.अ.गो.टेंबे, किर्लोस्करवाडी

× "साने गुरूजींच्यानंतर महाराष्ट्राला लाभलेली आई म्हणजे सातारा जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी तांबटकाका होय."

- जीवन किर्लोस्कर, पुणे.

× "तांबटकाका ही एक प्रेरणाशक्ती आहे." - उद्योगपती वा.रा. राजंदेकर, कोल्हापूर.

× "काका म्हणजे आमचे जवाहरलाल आहेत."

- श्री शामराव जाधव, मुंबई.

× "पलूसच्या धोंडीबुवासारखे तांबटकाकांचे काम आहे."

- एक आजी.

× "महात्मा गांधी व रामकृष्ण परमहंसासारखे तांबटकाका आचरण करतात."

- एम्.ए.जालिहाळ,किर्लोस्करवाडी.

× "तांबटकाका म्हटले की नाना पाटील बोर्डिंगची खास आठवण होते. त्यांच्या सेवाभावाला प्रामाणिक पणाला तोड नाही."

- रविंद्रपंत किर्लोस्कर,बेंगलोर

× "काकांचे नांव प्रज्वलित झाले पाहिजे व नव्या पिढीला नामवंताचे स्मरण राहिले पाहिजे असे मला वाटते."

- गान तपस्विनी आझमबाई, कोल्हापूर.

× "काकांचे महान कार्य पाहून मला परम संतोष होतो."

- महाराणीसाहेब, कोल्हापूर.

× "मनुष्य म्हणून आपणास या समाजाचे ॠण फेडावयाचे असते. ती भावना मनात ठेवून किती त-हेने प्रचंड कार्य करु शकतो याचा आदर्श म्हणजे तांबटकाका होत । तरुण पिढीने हाच आदर्श गिरवावा."

-श्रीमंत राणीसाहेब माईसाहेब पंडितपंत अमात्य,
गगनबावडा.

× "कुंडलच्या तांबटकाकांचे कार्य विद्यापीठाहून श्रेष्ठ आहे."

- कुलगुरु रा.कृ. कणबरकर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. १८

× "कुंडलचे काका म्हणजे आम्हा सर्वांना हिमालयाच्या सावलीप्रमाणे आहेत."

- श्रीमती ताई माळवदकर, पुणे.

× "तांबटकाकांचे कार्य सर्वार्थाने संपन्न झाले आहे. त्यांच्या कार्यामध्ये सौष्ठत्व आहे, समभाव आहे, सामान्य जनासंबंधीची कळकळ आहे."

- दे.भ. रत्नाप्पा कुंभार, कोल्हापूर.

× "कुंडलच्या तांबटकाकांनी सुरु केलेल्या वसतिगृहाचा सदैव उत्कर्ष होवो हीच इच्छा"

- बॅ. आप्पासाहेब पंत

× "लक्ष्मणराव किर्लोस्करांनी लोखंडी कारखाना सुरु केला तर लक्ष्मणराव तांबटांनी शिक्षणाचा कारखाना उघडला."
"आपले तन-मन-धन संस्थेत ओतून अक्षरशः राबेतून संस्था उभी करणारे तांबटकाका.

– पी.डी. गुणे, पुणे.

× "छत्रपती शिवरायांना संकटकाळी पंताजी कोपिनाथांची जशी मोलाची मदत झाली तशी आम्हा क्रांतीकारकांना तांबटकाकांची झाली."

– क्रांतीवीर नाथाजी लाड, सांगली.

× "विद्यार्थ्यांना काकांनी दिलेली जीवन संजीवनी हाच काकांचा खरा गौरव आहे."

– प्राचार्य भगवानराव बाबार, तासगांव

× "अनुसयाच्या आश्रमात तीन बाळं जेवली आणि तृप्त होऊन गेली पण कुंडलच्या काकांच्या आश्रमात त्रैलोक्यातील किती तरी बाळे आली, जीवन जगली, विद्यासंपन्न झाली आणि कुणी दत्त, कुणी ब्रम्हा, कुणी विष्णू होऊन गेली आणि विश्वात आपापल्या तेजाने तळपती झाली."

– गीतगायक बाळ कारंजकर, सांगली.

× "गांधीवाद-बुध्दीवाद व श्रमवाद यांचे सुरेख व्यक्तीमत्व म्हणजे तांबटकाका."

– के. सत्यनारायण, किर्लोस्करवाडी.

× "लोकसंग्रही तांबटकाकांचे नावाने कुंडलला महाविद्यालय, काढावे."

- प्रा. ना. सि. कुल्लुर, नेवासे.

× "निष्काम सेवेचा मूर्तिमंत पुतळा म्हणजेच तांबटकाका."

- अ.य. देशपांडे, रायगावकर

× "जसं पंढरपूरला कोणत्याही कामाला आपण गेलो की विठ्ठलाचे दर्शन घेतो तसे कुंडलला आलो की बोर्डिंगमध्ये तांबटकाकांचे दर्शन होतोच."

- धों.म. मोहिते, पत्रकार मोहिते, वडगांव. [१९]

× "मी आशिर्वाद देण्याइतका मोठा नाही. काकांना माझा आशिर्वाद नाही. त्यांच्या चरणी मी नम्रतेने आणि आदराने नमस्कार करतो."[२०]

- भाई माधवराव बागल.

........

आज सर्वच क्षेत्रात असामाजिक विध्वंसक भ्रष्टाचारी कार्याचे प्रचंड उधाण पहावयास मिळते. परंतु राष्ट्रसमर्पित विधायक व विकासास योग्य कार्य विचार मांडणारे स्वत: काही पावले या दृष्टीने चालणारे, आत्म-निरिक्षण निर्माण करणारे असे तांबटकाका यांचे व्यक्तिमत्व होते.

संकटाना सामोरे जाण्याची ताकद त्यांच्यात होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व (Versatile) उत्तुंग बनले होते. अशा थोर स्वातंत्र्य सेनानी, क्रांतीवीर, शैक्षणिक कार्यकर्ता, दलितांचा पालनकर्ता, अस्पृश्योध्दाराचे कार्य करणारा अशा तांबटकाका यांचे नांव भारतीय इतिहासात मोठे व प्रभावी मोलाचे कार्य करणारे म्हणून नोंदवावे लागेल.

आपल्या ८२ वर्षाच्या कारकिर्दीत दलितमित्र तांबटकाकांनी खऱ्या अर्थाने आपल्या देशबांधवांवर प्रेम केले. त्यांच्यासाठी ते अहोरात्र झटले.

.......

## संदर्भग्रंथ


१. मा. दलितमित्र तांबटकाका गौरव अंक, साप्ताहिक आपले जग, अंक ४५७, प्रकाशन ३० जुले, १९९०, पृ.क्र. ३.

२. कित्ता, - - पृ.क्र. ७.

३. कित्ता, - पृ.क्र. १०.

४. प्रा.पाटील दिनकर - दलितमित्र तांबटकाका स्मृतिग्रंथ,
प्रा. पवार जे.के. प्रकाशन, पृ.क्र.

५. कित्ता, - पृ.क्र. २८९

६. कित्ता, - पृ.क्र. १५०

७. कित्ता, - पृ.क्र. १५१

८. कित्ता - पृ.क्र. १५१

९. सा. आपले जग, प्रकाशन ९ ऑगष्ट, १९८२, अंक १६८, पृ.क्र. ७.

१०. कित्ता, - पृ.क्र. ७.

११. कित्ता, - पृ.क्र. ७.

१२. मु.शंकरराव चव्हाणांचे पत्र दि. ६.१०.१९८६

१३. वि.स. पागे यांचे पत्र दि. ९.४.१९८६.

१४. शारद पवार यांचे पत्र दि. ८ मार्च, १९८६.

१५. दे.भ. रत्नाप्पा कुंभार यांचे पत्र दि. ६.१.१९८६.

१६. प्रा. गं.बा. सरदार यांचे पत्र दि. १८.९.१९८६.

१७. आपले जग - उपनिर्दिष्ट, पृ.क्र. ५.

१८. दलितमित्र तांबटकाका गौरव अंक स्मरणिका, १९८१, पृ.क्र. २२.

१९. कित्ता, - पृ.क्र. २३.

२०. पाक्षिक स्द्रवाणी - जीवन किर्लोस्कर, प्रकाशन १ व १५ ऑगष्ट, १९८०, पृ.क्र. १६.


...........